महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला माळा, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक
दूरध्वनी क्र. २५७५६१५, २३१७९३८फॅक्स क्र. २५७९२०८.
ई-मेल :- aasctd.nsk-mh@mah.gov.in

जाहिरातीचा विषय :- **आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील बंद पडलेली/मान्यता रद्द करण्यात आलेली अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस हस्तांतर व स्थलांतर करणेबाबत.**

राज्यातील खालीलप्रमाणे अपर आयुक्त, नागपुर या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळा सद्यस्थितीत बंद पडलेली आहे.

**१.भारतीय आदिवासी शिव शिक्षण संस्था, गराडा ता.लाखनी जि.भंडारा द्वारा संचलित अनुदानित आश्रमशाळा जांभळी (खांबा) (प्रकल्प कार्यालय-भंडारा कार्यक्षेत्र)**

वरील बंद पडलेल्या अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस हस्तांतरीत व स्थलांतरीत करण्यासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्तीच्या आधारे अपर आयुक्त,नागपुर या विभागांत चालविण्याकरिता इच्छूक असलेल्या संस्थांकडून १५ दिवसांच्या विहित मुदतीत अर्ज आयुक्त आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,नाशिक या पत्त्यावर मागविण्यात येत आहेत.

-अटी व शर्ती-

१) इच्छूक स्वयंसेवी संस्था नोंदणी अधिनियम १८६०, सार्वजनिक विश्वस्त अनिनियम,१९५० अंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. तसेच संबधित स्वयंसेवी संस्थेची नोंदणी धर्मदाय आयुक्त यांचेकडे झालेली असावी. व संस्थेच्या उद्दीष्टांमध्ये शैक्षणिक कार्य किंवा शाळा/निवासी आश्रमशाळा चालविण्याबाबतचे उद्दिष्ट स्पष्टपणे नमुद केलेले असावे.

२) आदिवासी विकास विभागातील मान्यता रद्द करण्यात आलेल्या/बंद पडलेल्या अनुदानित आश्रमशाळा चालविण्याकरिता इच्छूक संस्था या महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक आहे.

३)इच्छूक संस्थेने दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून परिपूर्ण प्रस्ताव प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,भंडारा यांचेकडे ०४ प्रतीत स्पायरल बायडिंगसह सिलबंद लिफाफ्यामध्ये विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

४) आदिवासी विकास विभागातील बंद पडलेली अथवा मान्यता रद्द केलेली अनुदानित आश्रमशाळा ज्या अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यक्षेत्रात सुरु होती त्याच विभागात हस्तांतरीत/स्थलांतरीत करण्यासाठी अर्ज/प्रस्ताव सादर करावेत.

५) संबधित संस्थेकडे अनुदानित आश्रमशाळेसाठी वर्गखोल्या, मुख्याध्यापक कार्यालय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता कक्ष, प्रयोगशाळा, वाचनालय, संगणक कक्ष, स्वच्छतागृहे, पिण्याची पाण्याची सोय यांचेसह शाळेची सुसज्ज इमारत, स्नानगृहे, स्वच्छतागृहे यांचेसह मुले व मुलींकरीता स्वतंत्र वसतिगृह, स्वयंपाकगृह, भोजनकक्ष, पिण्याच्या/वापराच्या पाण्याची टाकी/पाणी पुरवठयाची इतर साधने, या सोयी-सुविधांची आश्रमशाळा संहितेमध्ये नमूद करण्यात आलेली मानके याप्रमाणे भौतिक सोयी-सुविधांनी युक्त आश्रमशाळेची इमारत असणे आवश्यक आहे.

६) संस्थेच्या कार्यकारणीतील अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सदस्य इत्यादींच्या नावात किंवा संस्थेच्या कार्यकारणीत तसेच उद्दीष्टांमध्ये कोणताही बदल झालेला नसल्याबाबतचे तसेच संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद-विवाद नाही किंवा प्रलंबित नाही याबाबतचे किंवा सध्या अस्तित्वात/कार्यरत असलेल्या कार्यकारणीबाबतचे संबधित धर्मदाय आयुक्तांचे प्रमाणपत्र संस्थेने प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे किंवा याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.५००/- एवढया किमतीचे बंधपत्र नोटरी करुन प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.

७) संस्थेच्या कार्यकारणीमध्ये शासकीय/निमशासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा आश्रमशाळेचे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश नसावा.

८) संस्थेच्या कार्यकारिणीमध्ये एकच व्यक्ती अध्यक्ष,कोषाध्यक्ष,सचिव,सदस्य किंवा सदस्य सचिव अशी एकापेक्षा जास्त पदे धारण करणारी नसावी.

९) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र व संस्थेच्या घटनेची प्रत सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन प्रस्तावासोबत सादर करावी.

१०) इच्छूक संस्थेने अर्ज करतांना परिपूर्ण प्रस्तावासोबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या नावाने रु.१०,०००/-(रुपये दहा हजार फक्त) एवढी रक्कम चलनाद्वारे त्यांच्या खात्यात भरणा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम ना-परतावा असेल.

११) इच्छूक संस्थेने याबाबत प्रस्ताव सादर करताना संस्थेकडे किमान १०.०० लक्ष (रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम किमान ०५ वर्षासाठी मुदतठेव स्वरुपात राष्ट्रीयकृत बँकेत उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी संबधित बँकेचे प्रमाणपत्र व मुदत ठेवीचा पुरावा प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे आश्रमशाळा चालविण्यासाठी किमान एक वर्षाचा खर्च भागविता येईल (किमान रु.१० लक्ष) इतकी रक्कम संस्थेच्या बचत किंवा चालू खात्यावर बँकेत शिल्लक असणे अनिवार्य आहे.

१२) संस्थेने सनदी लेखा परिक्षकामार्फत प्रमाणित केलेले मागील तीन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल आणि मागील तीन वर्षात भरलेल्या प्राप्तीकराच्या विवरणपत्राच्या सांक्षाकित प्रतीसह प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक आहे. जर संस्थेचे उत्पन्न करपात्र उत्पन्नापेक्षा कमी असेल तर Nil/निरंक किंवा जे काही विवरणपत्र आयकर विभागास मागील ०३ वर्षात दाखल केलेले असेल ते प्रस्तावासोबत जोडावे.

१३) संस्थेकडे किमान ०३ एकर जागा स्वत:च्या मालकीची असणे बंधनकारक राहील. याचा पुरावा म्हणुन ७/१२ उतारा व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावीत. त्याचप्रमाणे या जागेच्या मालकीबाबत कोणताही वाद मा.न्यायालयात प्रलंबित नसावा. ज्या संस्थेकडे स्वत:च्या मालकीची जागा नसेल अशा संस्था अपात्र होतील. तसेच सध्या स्वत:च्या मालकीची इमारत नसेल तर ०२ वर्षापर्यंत भाडेकराराच्या इमारतीमध्ये आश्रमशाळा चालविण्याची मुभा राहील. परंतु सदर ०२ वर्षाच्या कालावधीमध्ये स्वत:च्या मालकीच्या जागेवर इमारत बांधणे संस्थेस बंधनकारक असेल.

१४) संस्थेने आश्रमशाळेसाठी इमारत जर सध्या तात्पुरती भाडेकराराने घेतली असल्यास, त्या इमारतीची मालकी स्पष्टपणे संबधीत इमारत मालकाची असणे आवश्यक आहे. तसेच त्या इमारतीचा मालमत्ता उतारा हा नोंदणीकृत(रजिस्टर्ड) भाडेकरारनामा लिहून देणाऱ्या व्यक्तीच्या नावे असावा. याबाबत कोणत्याही मा. न्यायालयात वाद प्रलंबित नसावा. या इमारतीची मालकी एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावे असल्यास त्या सर्वांनी एकत्रितपणे नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरारनामा संबधित संस्थेच्या नावे करुन दिलेला असावा. भाडेकरारावर घेतलेली जागा किंवा इमारतीचा करारनामा हा संस्थेच्या सदस्यांचा "परिवार" किंवा "कुटुंबातील" सदस्यांच्या नावे केलेला नसावा आणि भाडेकराराची इमारतीची मालकी परिवारातील सदस्य किंवा कुटुंबापैकी नसावी.

१५) संस्थेची इमारत भाडे तत्त्वावर घेण्याबाबत केलेला करारनामा हा दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत (महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याप्रमाणे) केलेला असावा. सदर भाडेतत्वावरील इमारतीत अनुदानित आश्रमशाळेसाठी वर्गखोल्या, मुख्याध्यापक कार्यालय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता कक्ष, प्रयोगशाळा, वाचनालय,संगणक कक्ष, स्वच्छतागृहे, पिण्याची पाण्याची सोय यांचेसह शाळेची सुसज्ज इमारत, स्नानगृहे, स्वच्छतागृहे यांचेसह मुले व मुलींकरीता स्वतंत्र वसतिगृह, स्वयंपाकगृह, भोजनकक्ष, पिण्याच्या/वापराच्या पाण्याची टाकी/पाणी पुरवठयाची इतर साधने, या सोयी-सुविधांची आश्रमशाळा संहितेमध्ये नमूद करण्यात आलेली मानके याप्रमाणे भौतिक सोयी-सुविधांनी युक्त आश्रमशाळा इमारत असणे आवश्यक आहे.

१६) वर नमुदप्रमाणे संस्थेची स्वत:ची अथवा भाडयाची इमारत असेल तर त्याबाबत नकाशा बांधकाम क्षेत्रासहीत /बांधकामाचे वर्ष बांधकामाची वर्गवारी व फोटोग्राफसह ( राजपत्रित किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकित केलेला) प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१७) नियोजित आश्रमशाळेसाठी नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरारावर घेतलेली इमारत संस्थेस जास्तीत जास्त ०२ वर्षापर्यंत भाडेकरारावर घेता येईल. ०२ वर्षात संस्थेने आश्रमशाळा संहितेमधील मानकामध्ये नमूद सर्व भौतिक सोयी-सुविधांनी युक्त स्वत:च्या मालकीची सुसज्ज पक्की इमारत बांधकाम करून घेणे बंधनकारक राहील. तसेच सदर इमारत पक्की/चांगली विकसित असल्याबाबतचे प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिका-याकडून घ्यावे. भाडेकरारावर घेतलेल्या इमारतीमध्ये शाळा, वसतिगृह, भोजनगृह, स्वयंपाकगृह, स्नानगृह, शौचालय, संरक्षक भिंत, मुला मुलींच्या खेळण्यासाठी मैदान व इतर आवश्यक भौतिक सोयी-सुविधा स्वतः उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

१८) आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात बंद पडलेली किंवा मान्यता रद्द केलेली अनुदानित आश्रमशाळा हस्तांतरीत/स्थलांतरीत करण्यासाठी ज्या इच्छूक संस्थांनी प्रस्ताव सादर केला असेल त्या प्रस्तावासोबत या शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या बाबी आश्रमशाळा हस्तांतर/स्थलांतराचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षाच्या कालावधीत उपलब्ध करुन दिल्या नाही तर त्यांच्या संस्थेस पाच वर्षाच्या कालावधीनंतर इमारत असल्याबाबतचे हमीपत्र रु.१००/-एवढया रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करुन देणे संबधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर बंधपत्र प्रस्तावासोबत सादर न केल्यास त्या संस्थेस अपात्र ठरविण्यात येईल. बंद पडलेली/मान्यता रद्द केलेली अनुदानित आश्रमशाळा सदर संस्थेस चालविण्यास दिल्यापासून ०२ वर्षात जर स्वत:ची सर्व सोयी-सुविधायुक्त पक्की इमारत बांधली नाही, तर सर्व अनुदान बंद करुन त्या आश्रमशाळेची मान्यता रद्द करुन ती अन्य संस्थेस हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु केली जाईल.

१९) इच्छूक संस्थेस धर्मादाय आयुक्त, मा. न्यायालय किंवा शासनाने दंड केलेला नसावा. तसेच संस्थेमध्ये, संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही उपक्रमामध्ये, पदाधिकाऱ्यांमध्ये किंवा कर्मचाऱ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद उत्पन्न झालेला नसावा. त्याचप्रमाणे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी किंवा आर्थिक फसवणूकीचे गुन्हे कोणत्याही न्यायालयात चार्जशिट दाखल केलेले प्रकरण न्यायप्रविष्ठ नसावे. त्याबाबतची सविस्तर माहिती रू. १००/- एवढ्या रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करून प्रस्तावासोबत सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२०) संस्थेने यापूर्वी शासनाविरूद्ध मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे किंवा कसे? असल्यास ती प्रलंबित आहे का किंवा निकाल लागला असल्यास त्याची माहिती प्रस्तावासोबत सादर करावी.

२१) इच्छूक संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावातील सर्व माहिती खरी असल्याचे हमीपत्र रु.१००/-एवढ्या रक्कमेच्या बंधपत्रावर नोटरी करुन प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२२) विद्यार्थी संख्येअभावी ज्या आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात आली असेल अथवा आश्रमशाळा बंद पडली असेल तर अशी आश्रमशाळा अन्य संस्थेकडे हस्तांतरित करुन नजीकच्या ठिकाणी, लगतच्या तालुक्यात किंवा लगतच्या जिल्हयात स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. मात्र मुळ ठिकाणापासून स्थलांतरीत ठिकाण यामधील अंतर ५० कि.मी पेक्षा जास्त असणार नाही तसेच त्या प्रस्तावित ठिकाणाच्या ३ कि.मी परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र/दवाखाना व सदर ठिकाणी पोलीस ठाणे/पोलीस मदत केंद्र/पोलीस चौकी असणे आवश्यक आहे. त्यामुळे इच्छूक संस्थांनी सदर बाब विचारात घेवून प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.

२३) मान्यता रद्द केलेल्या अथवा बंद पडलेल्या आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन नवीन हस्तांतरीत/स्थलांतरीत झालेल्या आश्रमशाळेत करण्यात येईल. त्यामुळे सदरहू कर्मचाऱ्यांना तात्काळ रुजू करुन घेण्याची कार्यवाही संस्थेने करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन न झाल्यास आश्रमशाळा हस्तांतर/स्थलांतराचे आदेश रद्द करण्यात येतील.

२४) प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेद्वारे राबविण्यात आलेले सामाजिक/शैक्षणिक उपक्रमांची माहिती.

२५) प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेने प्रस्तावित अनुदानित आश्रमशाळेच्या परिसरातील आजूबाजुच्या दहा कि.मी परिसरातील इतर संस्थेच्या प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, शासकीय व अनुदानित आश्रमशाळा(आदिवासी विकास विभाग) यांची नावे व त्यांचे अंतर व त्यामधील विद्यार्थी संख्या सादर करणे आवश्यक राहील.

२६) प्रस्तावित आश्रमशाळेच्या ठिकाणापर्यंत बारमाही पक्के रस्ता असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२७) बंद पडलेली अनुदानित आश्रमशाळा ज्या ठिकाणी हस्तांतरीत/स्थलांतरीत करावयाची आहे त्या ठिकाणी आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी/आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्राकरीता आदिवासी लोकसंख्या अंदाजे ३००० ते ५००० इतकी असावी. तर दुर्गम भागातील क्षेत्रासाठी आदिवासी लोकसंख्या अंदाजे २००० ते ३००० इतकी असावी. तसेच आदिवासी उपयोजन क्षेत्रासाठी किमान ७ कि.मी आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात किमान १० किमी च्या परिसरात आदिवासी विकास विभागाची शासकीय किंवा अनुदानित आश्रमशाळा नसावी. त्या ठिकाणी पाणी पुरवठा, वीज, रस्ते,इत्यादी ची सोय असावी. तसेच परिसरातील १० कि.मी. भौगोलिक क्षेत्रातुन अनुदानित आश्रमशाळेकरीत पुरेशा प्रमाणात आदिवासी विद्यार्थी उपलब्ध असावेत.

२८) प्रस्तावित ठिकाणी नवीन अनु.आश्रमशाळा उघडावयास मंजुरी मिळाल्यास इयत्ता निहाय किती आदिवासी मुले/मुली मिळू शकतील याचा तपशील सादर करणे बंधनकारक राहील.

२९) मान्यता रद्द केलेली अथवा बंद पडलेली आश्रमशाळा ज्या संस्थेकडे हस्तांतर/स्थलांतरीत करण्यात येईल त्या आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन नवीन हस्तांतरीत/स्थलांतरीत झालेल्या आश्रमशाळेत करणे बंधनकारक राहिल.

३०) बंद पडलेल्या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन रिक्त राहणाऱ्या पदांवर शासनाच्या प्रचलित नियमानुसार व धोरणानुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन,उर्वरित कर्मचारी सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनंतर भरण्यात येईल.

३१) प्रस्तावित आश्रमशाळेच्या स्वत:ची इमारत/भाडयाची इमारत सर्व फर्निचर युक्त असणे आवश्यक आहे.

३२) आश्रमशाळा हस्तांतरण व स्थलांतराच्या प्राप्त अर्जाच्या पात्रतेकरिता विभागामार्फत सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार मुद्दयांना गुणांकन केले जाईल. हे गुणांकन एकूण १०० गुणांचे राहिल एकूण १०० पैकी किमान ६० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था या निवड प्रक्रियेच्या पुढील प्रक्रियेकरिता पात्र ठरतील.

३३)पात्र ठरलेल्या संस्थांमधून व शासन निर्णय दिनांक १५.१०.२०२४ मधील तरतुदीनुसार अंतिम संस्था निवड करण्याचा अधिकार शासनास राहिल. एखादया संस्थेला केवळ जास्त गुण प्राप्त झाले म्हणजेच त्या संस्थेची निवड होईल असे म्हणता येणार नाही.

३४) अपवादात्मक परिस्थितीत प्रकरणपरत्वे निकड व आवश्यकता विचारात घेऊन गुणवत्तेनुसार अटी व शर्ती शिथील करण्याचे अंतिम अधिकार शासनास राहतील.

वरील सर्व अटी व शर्तीप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या पुर्ततेसह विहित नमुन्यातील अर्ज अपर आयुक्त, आदिवासी विकास,नागपुर या कार्यालयात जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

Leena MBansod

लीना बनसोड (भा.प्र.से)
आयुक्त आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य,नाशिक

# अर्ज

**संस्थेचे नांव-----------------------**
**--------------------------------**
**पत्ता---------------------------**
**ईमेल----------------------------**
**मोबाईल क्रमांक------------------**
**दिनांक-------------------------**

प्रति,

मा.आयुक्त
आदिवासी विकास विभाग
नाशिक

**विषय**: संस्थेचे नांव----------------------------------या संस्थेची ---
---------------------येथील बंद पडलेली अनुदानित आश्रमशाळा आमच्या संस्थेस स्थलांतर व हस्तांतर होऊन चालविण्यास मिळणेबाबत

**संदर्भ**: आपली दैनिक वर्तमानपत्र ------------- मधील दिनांक /२०२६ रोजीची जाहिरात

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, विनंती करण्यात येते की, दैनिक वर्तमानपत्र------------ मधील आपले विभागाची दिनांक ---/---/२०२६ रोजीचे जाहिरातीचे अवलोकन करण्यात आले आहे. जाहिरातीत नमुद प्रमाणे अटी व शर्तीचे अवलोकन करण्यात आलेले आहे. त्यानुसार आपल्या विभागांतर्गत-------------- -------------------------------या संस्थेची------------------------------------------ येथील बंद पडलेली अनुदानित आश्रमशाळा आमच्या संस्थेस स्थलांतर व हस्तांतर होऊन ------------ -------------------------------या ठिकाणी चालविण्यास मिळण्याबाबतचा प्रस्ताव जाहिरातीत नमुद अटी व शर्तीनुसार अर्ज सादर करण्यात येत आहे.

सोबत: विहित नमुना अर्ज

आपला विश्वासू

अध्यक्ष/सविच
संस्थेचे नांव-----------------------
शिक्का

# अर्जाचा नमुना

## राज्यातील बंद पडलेली अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस हस्तांतर स्थलांतर करणेबाबत  इच्छूक संस्थेने करावयाचा अर्जाचा नमुना

| अ.क्रं | तपशील | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अर्ज सादर करणाऱ्या संस्थेचे नांव व पुर्ण पत्ता, ई-मेल आयडी संपर्क अधिकाऱ्याचे नांव व  मोबाईल नंबर | | |
| २ | संस्थेच्या नोंदणीचा रजिस्ट्रेशन नंबर व दिनांक (सोबत नोंदणी दाखले जोडावेत) | | |
| ३ | संस्थेची पदाधिकारी यांचे नांव व पत्ता (समितीतील सदस्यांची नांवे,त्यांचे व्यवसाय व पत्ते यांची यादी  सोबत जोडावी.) | | |
| ४ | संस्थेची लिखित घटना आहे काय त्याची प्रत जोडावी(सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन प्रस्तावासोबत सादर करावी) | | |
| ५ | इच्छूक संस्थेने अर्ज करतांना परिपूर्ण प्रस्तावासोबत आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांच्या नावाने नापरतावा रु.१०,०००/-(रुपये दहा हजार फक्त) एवढी रक्कम चलनाद्वारे त्यांच्या खात्यात भरली आहे काय ? सोबत चलनाची पोहोच सादर करावी. | | |
| ६ | संस्थेच्या उद्दिष्टांमध्ये शैक्षणिक कार्य किंवा शाळा/निवासी आश्रमशाळा चालविण्याबाबतचे उद्दिष्ट स्पष्टपणे नमुद आहे काय? | | |
| ७ | संस्था सध्या शाळा/आश्रमशाळा चालवित आहे काय? असल्यास त्यांची नांवे तसेच संस्थेमार्फत सुरु असलेले इतर उपक्रम त्याची तपशिलवार माहिती | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | जाहिरातीत नमुद बंद पडलेली/मान्यता रद्द केलेली आश्रमशाळा ज्या विभागातील आहे त्याच विभागात तथापि, बंद/रद्द झालेल्या आश्रमशाळेपासून ५० कि.मी च्या आतील परिसरात स्थलांतर व हस्तांतर करुन चालविण्यास मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे काय? असल्यास अंतर किमी मध्ये नमुद करावे. | | |
| ९ | इच्छूक संस्थेने याबाबत प्रस्ताव सादर करतांना संस्थेकडे किमान १० लक्ष(रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम किमान ०५ वर्षासाठी मुदतठेव स्वरुपात राष्ट्रीयकृत बँकेत उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी संबधित बँकेचे प्रमाणपत्र व मुदत ठेवीचा पुरावा प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहिल. त्याचप्रमाणे आश्रमशाळा चालविण्यासाठी किमान एक वर्षाचा खर्च भागविता येईल (किमान रु.१० लक्ष) इतकी रक्कम संस्थेच्या बचत किंवा चालू खात्यावर बँकेत शिल्लक असणे अनिवार्य आहे. | | |
| १० | संस्थेने सनदी लेखा परिक्षकामार्फत प्रमाणित केलेले मागील तीन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल आणि मागील तीन वर्षात भरलेल्या प्राप्तीकराच्या विवरणपत्राच्या सांक्षाकित प्रती प्रस्तावासोबत जोडलेल्या आहेत काय जर संस्थेचे उत्पन्न करपात्र उत्पन्नापेक्षा कमी असेल तर NIL/निरंक किंवा जे काही विवरणपत्र आयकर विभागास मागील ०३ वर्षात दाखल केलेले असेल ते प्रस्तावासोबत जोडावे. | | |
| ११ | संस्थेचे बँकेचे खाते हाताळण्यास कोणास अधिकार दिले आहेत त्या पदाधिकाऱ्यांची नाव पद व पत्ता व्यवसाय (संस्थेच्या ठरावाची प्रत जोडावी) | | |
| १२ | प्रस्तावित आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाचे गांव आदिवासी उपयोजना क्षेत्रात येते किंवा आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर याबाबतचा प्रकल्प अधिकारी यांचा दाखला सादर करावा.(गावाचा तपशील- गांव,तालुका,जिल्हा) | | |
| १३ | अ)आदिवासी उपयोजना क्षेत्रात असेल तर त्या गावाची आदिवासी लोकसंख्या<br>ब) आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील असेल तर त्या गावाची आदिवासी लोकसंख्या<br>(प्रकल्प अधिकारी यांनी प्रमाणित केलेली) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | प्रस्तावित आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाच्या ठिकाणापासून १० कि.मी.परिसरातील गावांची आदिवासी लोकसंख्या ( सोबत जोडलेल्या नमुन्यात संबधित प्रकल्प अधिकारी/ ग्राम विकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेली) | | |
| १५ | प्रस्तावित आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाच्या ठिकाणी व त्या गावाच्या १० कि.मी.परिसरातील शासकीय/अनुदानित आश्रमशाळा, संस्थेच्या शाळा,जिल्हा परिषद शाळा(प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक) यांची नांवे व तेथील विद्यार्थी संख्या व प्रस्तावित शाळेपासूनचे अंतर ( सोबत जोडलेल्या नमुन्यात गटशिक्षणाधिकारी यांनी प्रमाणित केलेली) | | |
| १६ | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी संस्थेच्या मालकीची किमान ०३ एकर जागा आहे काय? असल्यास क्षेत्रफळ नमुद करावे व ७/१२ उतारा सोबत जोडण्यात यावा. | | |
| १७ | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी संस्थेच्या स्वत:च्या मालकीची इमारत आहे काय?, असल्यास किती खोल्या आहेत,एकूण क्षेत्रफळ किती, त्याचा नकाशा व इमारतीचे फोटो (GEO TAG PHOTO) जोडावा सदर इमारत आश्रमशाळेतील मुलांसाठी राहण्यासाठी पुरेशी व योग्य राहिल याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. | | |
| १८ | सोबत जोडलेल्या नमुन्यात इमारतीत असलेल्या मुलभुत सोयी-सुविधांची माहिती सादर करावी. | | |
| १९ | संस्थेच्या स्वत:च्या मालकीची इमारत असल्यास, शाळा इमारत व वसतिगृह बांधकाम पक्के(RCC बांधकाम) किंवा पत्र्याची आहे किंवा कसे? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी संस्थेच्या मालकीची स्वत:ची इमारत नसल्यास, भाडयाने घेतलेल्या इमारतीमध्ये किती खोल्या आहेत,एकूण क्षेत्रफळ किती त्याचा नकाशा व इमारतीचे फोटो (GEO TAG PHOTO) सोबत जोडावा सदर इमारत आश्रमशाळेतील मुलांसाठी राहण्यासाठी पुरेशी व योग्य राहिल याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. प्रस्तावित आश्रमशाळेची इमारत भाडयाने घेतली असल्यास त्याबाबत मालकाशी केलेल्या करारनाम्याची प्रत सोबत जोडावी. तसेच बांधकाम पुर्णत्वाचा दाखला (स्थानिक नागरी प्रशासन) सोबत जोडणे अत्यावशक राहिल. | | |
| २१ | संस्थेने भाडेकराराने घेतलेली , शाळा व वसतिगृह इमारत बांधकाम पक्के(RCC बांधकाम) किंवा पत्र्याची आहे किंवा कसे? | | |
| २२ | संस्थेने आश्रमशाळेसाठी इमारत जर सध्या तात्पुरती भाडेकराराने घेतली असल्यास, त्या इमारतीची मालकी स्पष्टपणे संबधीत इमारत मालकाची आहे काय? तसेच त्या इमारतीचा मालमत्ता उतारा हा नोंदणीकृत(रजिष्टर्ड) भाडेकरारनामा लिहून देणाऱ्या व्यक्तीच्या नावे आहे काय? याबाबत कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित आहे किंवा कसे? या इमारतीची मालकी एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावे असल्यास त्या सर्वांनी एकत्रितपणे नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरारनामा संबधित संस्थेच्या नावे करुन दिलेला आहे काय ?भाडेकरारावर घेतलेली जागा किंवा इमारतीचा करारनामा हा संस्थेच्या सदस्यांचा "परिवार" किंवा "कुटुंबातील" सदस्यांच्या नावे केलेला आहे किंवा कसे? आणि भाडेकराराची इमारतीची मालकी परिवारातील सदस्य किंवा कुटुंबापैकी आहे किंवा कसे? | | |
| २३ | संस्थेची इमारत भाडे तत्त्वावर घेण्याबाबत केलेला करारनामा हा दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत (महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याप्रमाणे) केलेला आहे काय? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | सध्या स्वत:च्या मालकीची इमारत नसेल तर ०२ वर्षापर्यंत भाडेकराराच्या इमारतीमध्ये आश्रमशाळा चालविण्याची मुभा राहील. परंतु ०२ वर्षाच्या मुदतीत संस्थेने आश्रमशाळा संहितेमधील मानकामध्ये नमूद सर्व भौतिक सोयी-सुविधांनी युक्त स्वत:च्या मालकीची सुसज्ज पक्की इमारत बांधकाम करून घेणे बंधनकारक राहील. व तसे रु.५००/-एवढया रक्कमेच्या बंधपत्रावर नोटरी करुन देणे बंधनकारक राहिल. | | |
| २५ | प्रस्तावित आश्रमशाळेच्या ठिकाणी जाण्यायेण्यासाठी बारमाही रस्ता असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय? | | |
| २६ | ज्या गावी आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाची आहे तेथे पाण्याची सोय उपलब्ध आहे काय ? (विहिर,नदी,नळ इ.) असल्यास शाळेपासून किती अंतरावर आहे. पाण्याची योग्य सोय नसल्यास कोणती सोय संस्था करणार आहे, पाणी बारमाही उपलब्ध होऊ शकेल याबाबत माहिती. | | |
| २७ | प्रस्तावित आश्रमशाळेच्या ठिकाणाच्या ३ कि.मी परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र/दवाखाना व सदर ठिकाणी पोलीस ठाणे/पोलीस मदत केंद्र/पोलीस चौकी असणे बंधनकारक राहिल. याबाबत स्थानिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व संबधित पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. | | |
| २८ | आश्रमशाळा हस्तांतरीत/स्थलांतरीत करण्यास मंजुरी मिळाल्यास मंजुर इयत्तेनिहाय किती आदिवासी मुले/मुली मिळू शकतील याबाबतचा तपशील सादर करणे आवश्यक आहे. | | |
| २९ | संस्थेस शासनाने आश्रमशाळा हस्तांतरणास मंजुरी दिल्यास संस्था पुढे तीन वर्ष संस्थेसाठी येणारा खर्च कसा भागविणार याबाबत पुढील तीन वर्षाचे नियोजन अंदाजपत्रक जोडावे. | | |
| ३० | शासनाने आश्रमशाळा हस्तांतरण व स्थलांतरणास परवानगी दिल्यास संस्थेस शासनाने वेळोवेळी ठरविलेले नियम बंधनकारक राहतील याबाबत संस्था प्रमुखांचे हमीपत्र सोबत जोडले आहे काय | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | संस्थेस धर्मादाय आयुक्त, मा. न्यायालय किंवा शासनाने दंड केलेला नसावा. तसेच संस्थेमध्ये, संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही उपक्रमामध्ये, पदाधिकाऱ्यांमध्ये किंवा कर्मचाऱ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद उत्पन्न झालेला नसावा. त्याचप्रमाणे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी किंवा आर्थिक फसवणूकीचे गुन्हे कोणत्याही न्यायालयात चार्जशिट दाखल केलेले प्रकरण न्यायप्रविष्ठ नसावे. त्याबाबतची सविस्तर माहिती रू. ५००/- एवढ्या रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करून प्रस्तावासोबत जोडली आहे काय | | |
| ३२ | संस्थेने यापूर्वी शासनाविरूद्ध मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे किंवा कसे? असल्यास ती प्रलंबित आहे का किंवा निकाल लागला असल्यास त्याची माहिती प्रस्तावासोबत जोडली आहे काय? | | |
| ३३ | प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेविरुध्द यापूर्वी कोणत्याही विभागाने नोटीस बजावून कार्यवाही केलेली आहे काय? | | |
| ३४ | प्रस्तावित आश्रमशाळा संस्थेला मंजुर झाली तर, कर्मचारी /विद्यार्थी समायोजनबाबत अर्जासोबत जोडलेले शपथपत्र रु.५०० एवढया रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करुन सादर करणे बंधनकारक राहिल. | | |

## प्रमाणपत्र

**प्रमाणित करण्यात येते की, वरीलप्रमाणे अर्जात नमुद केलेली सर्व माहिती बरोबर असल्याची असल्याची आम्ही खात्री केलेली आहे. तसेच जाहिरातीतील अटी व शर्ती पुर्ण वाचलेल्या असून, त्या आम्हाला मान्य आहेत. सदरची माहिती खोटी आढळल्यास, आमचे संस्थेचा अर्ज कायमस्वरुपी रद्द ठरविण्याची कारवाई केल्यास ती आम्हाला व आमचे संस्थेस मान्य राहील याची मी/आम्ही हमी देत आहे. त्याकरिता आम्ही न्यायालयात दाद मागणार नाही अशीही हमी आम्ही देत आहे.**

**ठिकाण:** आपला विश्वासू

**दिनांक:** अध्यक्ष/सेक्रेटरी

सहपत्र क्रं.०१

अ) प्रस्तावित शाळेच्या ठिकाणापासून१० कि.मी परिसरातील गावातील लोकसंख्येबाबत द्यावयाचा तपशील

| अ.क्रं | गांवाचे नांव | क्षेत्र (TSP/OTSP) | प्रस्तावित अनुदानित आश्रमशाळा ज्या ठिकाणी सुरु करावयाची आहे त्या गावापासून अंतर | गावाची लोकसंख्या | गावातील आदिवासी लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| (१) | | | | | |
| (२) | | | | | |
| (३) | | | | | |
| (४) | | | | | |
| (५) | | | | | |
| (६) | | | | | |
| (७) | | | | | |
| (८) | | | | | |
| (९) | | | | | |
| (१०) | | | | | |

प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
-------------ता.--------
जि.---------------

## सहपत्र क्रं.०२

प्रस्तावित आश्रमशाळा ठिकाणापासून१० किमी परिसरातील प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक,जिल्हा परिषद तसेच आदिवासी विकास विभागातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची नांवे व विद्यार्थ्यांची संख्या

| अ.क्रं | शाळेचे नांव | गावाचे नांव | प्रस्तावित शाळेपासूनचे अंतर | इयत्ता (पासून –पर्यंत) | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | | | | | |
| (२) | | | | | |
| (३) | | | | | |
| (४) | | | | | |
| (५) | | | | | |
| (६) | | | | | |
| (७) | | | | | |
| (८) | | | | | |
| (९) | | | | | |
| (१०) | | | | | |

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती--------
जि.-------------------

# सहपत्र क्रं.०३

## प्रस्तावित आश्रमशाळेच्या स्वत:च्या इमारतीत/भाडयाच्या इमारतीत असलेल्या मुलभूत भौतिक सोयी-सुविधांची माहिती

| अ.क्र | उपलब्ध असलेल्या संस्थेच्या मालकीच्या अथवा भाडेतत्वावरील इमारतीचा तपशील व बाब निहाय क्षेत्रफळ/संख्या | संख्या | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित आश्रमशाळेची स्वत:ची इमारत आहे किंवा भाडयाची आहे याबाबत तपशील | | |
| २ | वर्गखोल्या | | |
| ३ | प्रयोगशाळा | | |
| ४ | शिक्षक कक्ष | | |
| ५ | मुख्याध्यापक कक्ष | | |
| ६ | संगणक कक्ष | | |
| ७ | ग्रंथालय | | |
| ८ | क्रिडांगण | | |
| ९ | व्यायाम साहित्य/क्रिडा साहित्य | | |
| १० | स्नानगृहे | | |
| ११ | शौचालये | | |
| १२ | स्वतंत्र मुले वसतिगृह- | | |
| १३ | स्वतंत्र मुली वसतिगृह | | |
| १४ | बेड/बंकबेड सुविधा | | |
| १५ | वॉटर प्युरीफायर | | |
| १६ | अधिक्षक कार्यालय व निवासव्यवस्था | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | अधिक्षिका कार्यालय व निवासव्यवस्था | | |
| १७ | सिकरुम/रुग्ण कक्ष | | |
| १८ | भोजनगृह | | |
| १९ | भांडी साहित्य | | |
| २० | कोठीगृह | | |
| २१ | स्वयंपाकगृह | | |
| २२ | विद्युत पुरवठा | | |
| २३ | कर्मचारी निवास स्थान | | |
| २४ | संरक्षक भिंत | | |
| २५ | बहुउद्देशिय हॉल | | |
| २६ | गरम पाण्याची सुविधा | | |
| २७ | इन्सिनेटर | | |
| २८ | सी.सी.टी. व्ही. | | |

वर नमुद केलेली माहिती खरी असून, त्याबाबचे फोटो (GEO TAG) प्रस्तावासोबत जोडलेले आहेत. सदरची माहिती खोटी आढळल्यास संस्थेचा प्रस्ताव नामंजुर करण्यात येईल याची आम्हाला जाणीव आहे.

**संस्था अध्यक्षाचे नांव**

**स्वाक्षरी**

**संस्थेचा शिक्का**

समायोजनबाबत हमीपत्र नमुना

(रु.५०० एवढया रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करुन)

मी-----------------------------------------------पदनाम--------------संस्थेचे नांव-------------------वय---- राहणार------------------सत्यप्रतिज्ञेवर खालीलप्रमाणे लिहून देत आहे.

१.आमच्या संस्थेला बंद पडलेली किंवा मान्यता रद्द करण्यात आलेली अनुदानित आश्रमशाळा हस्तांतरीत व स्थलांतरीत करुन चालविण्यास मिळाल्यास बंद पडलेल्या अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन आमच्या आश्रमशाळेत आम्ही करण्यास बांधील आहोत.

२.कोणत्याही कारणास्तव कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यास नकार देणार नाही व जर असे कर्मचारी आमच्या आश्रमशाळेत आम्ही समायोजित करुन घेतले नाही तर आमच्या शाळेची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल याची जाणीव आम्हाला विभागामार्फत करुन देण्यात आलेली आहे..

३.तसेच आयुक्त, अपर आयुक्त,प्रकल्प अधिकारी, यांनी वेळोवेळी इतर अनुदानित आश्रमशाळांवरील कर्मचाऱ्यांचे समायोजनाचे आदेश काढले तर त्या कर्मचाऱ्यांनासुध्दा समायोजन करुन घेण्याची जबाबदारी आमची राहिल.

४.समायोजन करुन रिक्त राहणाऱ्या पदांवर शासनाच्या प्रचलित नियमानुसार व धोरणानुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन,उर्वरित कर्मचारी सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनंतर भरण्यात येईल.

**संस्था अध्यक्षाचे नांव**

**स्वाक्षरी**

**संस्थेचा शिक्का**

# गुणांकन निकष

## राज्यातील बंद पडलेली अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस हस्तांतर स्थलांतर करणेबाबत इच्छूक संस्थेने करावयाच्या प्रस्तावाचे गुणांकन निकष

**संस्थेचे नांव-------------------------------------------------------**

**कोणती बंद पडलेली आश्रमशाळेची मागणी केलेली आहे.---------------------**

**प्रस्तावित आश्रमशाळेच्या गावांचे नांव-------------------------------------**

| अ.क्रं | तपशील | एकूण गुण | पैकी प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| | **(अ) विभाग गुण** | | |
| १ | संस्थेच्या उद्दिष्टांमध्ये शैक्षणिक कार्य किंवा शाळा/निवासी आश्रमशाळा चालविण्याबाबतचे उद्दिष्ट स्पष्टपणे नमुद असल्यास. | | |
| २ | संस्था सध्या शाळा/आश्रमशाळा चालवित आहे काय? असल्यास त्यांची नांवे तसेच संस्थेमार्फत सुरु असलेले इतर उपक्रम त्याची तपशिलवार माहिती सादर केलेली असल्यास. | | |
| ३ | जाहिरातीत नमुद बंद पडलेली/मान्यता रद्द केलेली आश्रमशाळा ज्या विभागातील आहे त्याच विभागात तथापि, बंद/रद्द झालेल्या आश्रमशाळेपासून ५० कि.मी च्या आतील परिसरात स्थलांतर व हस्तांतर करुन चालविण्यास मिळणेसाठी अर्ज सादर केलेला असल्यास. | | |
| ४ | इच्छूक संस्थेने याबाबत प्रस्ताव सादर करतांना संस्थेकडे किमान १० लक्ष(रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम किमान ०५ वर्षासाठी मुदतठेव स्वरुपात राष्ट्रीयकृत बँकेत उपलब्ध असल्याबाबत संबधित बँकेचे प्रमाणपत्र व मुदत ठेवीचा पुरावा प्रस्तावासोबत सादर केलेला असल्यास. | | |
| ५ | आश्रमशाळा चालविण्यासाठी किमान एक वर्षाचा खर्च भागविता येईल (किमान रु.१० लक्ष) इतकी रक्कम संस्थेच्या बचत किंवा चालू खात्यावर बँकेत शिल्लक असल्यास. | | |
| ६ | अ.संस्थेने सनदी लेखा परिक्षकामार्फत प्रमाणित केलेले मागील तीन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल आणि मागील तीन वर्षात भरलेल्या प्राप्तीकराच्या विवरणपत्राच्या सांक्षाकित प्रती प्रस्तावासोबत जोडलेला असल्यास. | | |
| | **एकूण -----पैकी प्राप्त गुण** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **(ब) विभाग गुण** | | |
| ०७ | प्रस्तावित आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाचे गांवाचे क्षेत्र आदिवासी उपयोजना क्षेत्रात येत असल्यास. | | |
| ०८ | प्रस्तावित आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाचे गांवाचे क्षेत्र आदिवासी उपयोजनाबाहेरील क्षेत्रात येत असल्यास. | | |
| ०९ | आदिवासी उपयोजना क्षेत्रात असेल तर त्या गावाची आदिवासी लोकसंख्या २००० ते ३००० असेल दरम्यान असल्यास. | | |
| १० | आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील असेल तर त्या गावाची आदिवासी लोकसंख्या ३००० ते ५००० दरम्यान असल्यास. | | |
| ११ | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी संस्थेच्या मालकीची किमान ०३ एकर जागा असल्यास (संस्थेच्या मालकीची स्वत:ची किमान ०३ एकर जागा नसल्यास अर्ज अपात्र) | | |
| | **एकूण---------पैकी प्राप्त गुण** | | |
| | **(क) विभाग गुण** | | |
| १२ | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी संस्थेच्या स्वत:च्या मालकीची सुसज्ज (RCC बांधकाम) इमारत असल्यास. | | |
| १३ | प्रस्तावित आश्रमशाळा इमारत ही विद्यार्थ्यांचे शिक्षण, आरोग्य, निवास व अध्यापन या सर्व बाबींच्या अनुषंगाने आवश्यक ते फर्निचर युक्त असल्यास. | | |
| १४ | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी संस्थेच्या स्वत:च्या मालकीची पत्र्याची/तात्पुरती इमारत असल्यास. | | |
| १५ | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी भाडयाची सुसज्ज (RCC बांधकाम) इमारत असल्यास. | | |
| १६ | प्रस्तावित आश्रमशाळा ज्या गावी स्थलांतरीत करावयाची आहे त्या गावी संस्थेच्या भाडयाची पत्र्याची/तात्पुरती इमारत असल्यास. (संस्थेने आश्रमशाळेसाठी इमारत जर सध्या तात्पुरती भाडेकराराने घेतली असल्यास, त्याबाबतचे कागदपत्रे जाहिरातीतील अटी व शर्तींनुसार असणे आवश्यक आहे) | | |
| | **एकूण ------पैकी प्राप्त गुण** | | |

| | (ड) विभाग गुण | | |
|---|---|---|---|
| १७ | प्रस्तावित आश्रमशाळेच्या ठिकाणी जाण्यायेण्यासाठी बारमाही पक्का रस्ता (डांबरीकरण/सिमेंट)असल्यास. | | |
| १८ | ज्या गावी आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाची आहे तेथे पाण्याची मुबलक सोय उपलब्ध असल्यास. (विहिर,बोअरवेल,ग्रा.पं नळ इ.) | | |
| १९ | प्रस्तावित आश्रमशाळेच्या ठिकाणाच्या ३ कि.मी परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र/दवाखाना उपलब्ध असल्यास. | | |
| २० | प्रस्तावित आश्रमशाळेच्या ठिकाणाच्या ३ कि.मी परिसरात ठिकाणी पोलीस ठाणे/पोलीस मदत केंद्र/पोलीस चौकी असल्यास. | | |
| २१ | प्रस्तावित आश्रमशाळा संस्थेला मंजुर झाली तर, कर्मचारी /विद्यार्थी समायोजनबाबत अर्जासोबत जोडलेले शपथपत्र रु.५०० एवढया रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करुन सादर केलेले असल्यास. | | |
| | **एकूण ----- पैकी प्राप्त गुण** | | |

**(सूचना- वरीलप्रमाणे विभागनिहाय एकूण १०० पैकी पात्रतेच्या निकषांनुसार गुणांचे गुणदान करावे.)**

**आदिवासी विकास विभागातील मान्यता रद्द करण्यात आलेल्या/बंद करण्यात आलेल्या अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस चालविणेस देण्याबाबतची कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-अआशा.२०२४/प्र.क्र.२००/का.११**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १५ ऑक्टोबर, २०२४

**वाचा-:**

१. शासन निर्णय क्रमांक:- अआशा.२०१६/प्र.क्र.१२९/का.११, दिनांक ०८ जून, २०१६.
२. शासन निर्णय क्र. अआशा-२०१६/प्र.क्र. १२९/का. ११, दि. २९/०४/२०१७.
३. शासन निर्णय क्रमांक:- अआशा.२०१९/प्र.क्र.१०२/का.११, दिनांक ११ जून, २०१९
४. शासन निर्णय क्रमांक:- अआशा.२०२३/प्र.क्र.७१/का.११, दिनांक २३ ऑगस्ट, २०२३.

**प्रस्तावना:-**

आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी ५५६ अनुदानित आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येत आहेत. आश्रमशाळा संहितेमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास अशा आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात येते. संबंधित संस्थांनी अनुदानित आश्रमशाळा चालविण्यास असमर्थता दर्शविली तर अशाही आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात येते. ज्या संस्था शासनाच्या अटी व शर्तीनुसार चालवित नाहीत व ज्या संस्थाना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार उचित संधी देऊनही विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार व शासनाच्या ध्येय धोरणानुसार आश्रमशाळा चालवत नाहीत. अशाही आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात येते. अशा मान्यता रद्द केलेल्या/ बंद आश्रमशाळा अन्य संस्थांना चालविण्यास देण्याबाबतची कार्यपध्दती संदर्भाधीन दिनांक २३.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली होती. तथापि या प्रकरणी मा. न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचना विचारात घेऊन संदर्भाधीन क्र.४ येथील दिनांक २३.०८.२०२३ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

आदिवासी विकास विभागातील मान्यता रद्द करण्यात आलेल्या/बंद करण्यात आलेल्या अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस चालविणेस देण्याबाबतच्या कार्यपध्दतीत सुधारणा करुन खालीलप्रमाणे सुधारीत निकष व कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

**अ. आदिवासी विकास विभागांतर्गत अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस हस्तांतर स्थलांतर करण्यासंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती:-**

१. आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात बंद पडलेली किंवा मान्यता रद्द केलेली अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेकडे हस्तांतरीत /स्थलांतरीत करण्याकरीता इच्छूक संस्थाकडून प्रस्ताव मागविण्यात यावेत. त्याकरीता ती आश्रमशाळा ज्या अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यक्षेत्रात बंद पडलेली आहे अथवा तिची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे त्या अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या विभागातील दोन दैनिक वर्तमानपत्रात तसेच राज्यस्तरावरील दोन वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी. यासाठी जाहिरात प्रकाशित झाल्यानंतर १५ दिवसांचा अवधी देण्यात यावा.

२. बंद पडलेली अथवा मान्यता रद्द केलेली अनुदानित आश्रमशाळा ज्या अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यक्षेत्रात सुरु होती त्याच विभागात हस्तांतरीत/स्थलांतरीत करण्याठी प्रस्ताव मागविण्यात यावेत. राज्यातील बंद पडलेली किंवा मान्यता रद्द केलेल्या अनुदानित आश्रमशाळांपैकी मा. मंत्री महोदयांकडे अपिल दाखल केलेल्या तसेच मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणांबाबत मा. मंत्री/मा. उच्च न्यायालयाने “Status Quo/Stay” असे निर्देश दिले असतील तरच अशा आश्रमशाळा या जाहिरातीमधून वगळण्यात याव्या.

३. इच्छूक स्वयंसेवी संस्था नोंदणी अधिनियम १८६०, सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. तसेच संबंधित स्वयंसेवी संस्थेची नोंदणी धर्मादाय आयुक्त यांचेकडे झालेली असावी व संस्थेच्या उद्दिष्टामध्ये शैक्षणिक कार्य किंवा शाळा/निवासी आश्रमशाळा चालविण्याबाबतचे उद्दिष्ट स्पष्टपणे नमूद केलेले असावे.

४. इच्छूक संस्थाकडून याबाबत प्रस्ताव मागविताना इच्छुक संस्था महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक आहे.

५. इच्छूक संस्थेने दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरुन परिपूर्ण प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे सिलबंद लिफाफ्यामध्ये विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर विचार केला जाणार नाही.

६. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी इच्छूक संस्थेकडे अनुदानित आश्रमशाळेसाठी वर्ग खोल्या, मुख्यध्यापक कार्यालय, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरीता कक्ष, प्रयोगशाळा, वाचनालय, संगणक कक्ष, स्वच्छतागृहे, पिण्याची पाण्याची सोय यांचेसह शाळेची सुसज्ज इमारत, स्नानगृहे, स्वच्छतागृहे यांचेसह मुले व मुलींकरीता स्वतंत्र वसतिगृह, स्वंयपाकगृह, भोजनकक्ष, पिण्याच्या/वापराच्या पाण्याची टाकी/पाणी पुरवठ्याची इतर साधने, या सोयी सुविधांची आश्रमशाळा संहितेमध्ये नमूद करण्यात आलेले मानके तसेच सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टामधील बाबींच्या अनुषंगाने तपासणी करुन तपासणी अहवाल अपर आयुक्त यांचेमार्फत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सादर करावा.

७. संस्थेच्या कार्यकारणीतील अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सदस्य इत्यादिंच्या नावात किंवा संस्थेच्या कार्यकारणीत तसेच उदिष्टांमध्ये कोणताही बदल झालेला नसल्याबाबतचे तसेच संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद-विवाद नाही किंवा प्रलंबित नाही याबाबतचे किंवा सध्या अस्तित्वात/कार्यरत असलेल्या कार्यकारणीबाबतचे संबंधित धर्मादाय आयुक्तांचे प्रमाणपत्र संस्थेने प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे किंवा याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- एवढया किमतीचे बंधपत्र नोटरी करुन प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.

८. संस्थेच्या कार्यकारणीमध्ये शासकीय/निमशासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा आश्रमशाळेचे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश नसावा.

९. संस्थेच्या कार्यकारणीमध्ये एकच व्यक्ती अध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव, सदस्य किंवा सदस्य सचिव अशी एकापेक्षा जास्त पदे धारण करणारी नसावी.

१०. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र व संस्थेच्या घटनेची प्रत सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन प्रस्तावासोबत सादर करावी.

११. इच्छूक संस्थेने अर्ज करतांना परिपूर्ण प्रस्तावासोबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या नावाने रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) एवढी रक्कम चलनाव्दारे त्यांच्या खात्यात भरणा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम ना-परतावा असेल.

१२. इच्छूक संस्थेने याबाबत प्रस्ताव सादर करताना संस्थेकडे किमान १०.०० लक्ष (रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम किमान ०५ वर्षासाठी मुदतठेव स्वरुपात राष्ट्रीयकृत बँकेत उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित बँकेचे प्रमाणपत्र व मुदत ठेवीचा पुरावा प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे आश्रमशाळा चालविण्यासाठी किमान एक वर्षाचा खर्च भागविता येईल (किमान रु. १०. लक्ष) इतकी रक्कम संस्थेच्या बचत किंवा चालू खात्यावर बँकेत शिल्लक असणे अनिवार्य आहे.

१३. संस्थेने सनदी लेखा परिक्षकामार्फत प्रमाणित केलेले मागील तीन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल आणि मागील तीन वर्षात भरलेल्या प्राप्तीकराच्या विवरणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक आहे. जर संस्थेचे उत्पन करपात्र उत्पन्नापेक्षा कमी असेल तर “Nil/निरंक” किंवा जे काही विवरणपत्र आयकर विभागास मागील ०३ वर्षात दाखल केलेले असेल ते प्रस्तावासोबत जोडावे.

१४. संस्थेकडे किमान ०३ एकर जागा स्वत:च्या मालकीची असणे बंधनकारक राहील. याचा पुरावा म्हणुन ७/१२ उतारा व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावीत. त्याचप्रमाणे या जागेच्या मालकीबाबत कोणताही वाद मा. न्यायालयात प्रलंबित नसावा. ज्या संस्थेकडे स्वत:च्या मालकीची जागा नसेल अशा संस्था अपात्र होतील. तसेच सध्या स्वत:च्या मालकीची इमारत नसेल तर २ वर्षापर्यंत भाडेकराराच्या इमारतीमध्ये आश्रमशाळा चालविण्याची मुभा राहील. परंतु सदर २ वर्षाच्या कालावधीमध्ये स्वत:च्या मालकीच्या जागेवर इमारत बांधणे संस्थेस बंधनकारक असेल.

१५. संस्थेने आश्रमशाळेसाठी इमारत जर सध्या तात्पुरत्या भाडेकराराने घेतली असल्यास त्या इमारतीची मालकी स्पष्टपणे संबंधीत इमारत मालकाची असणे आवश्यक आहे. तसेच त्या इमारतीचा मालमत्ता उतारा हा नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरारनामा लिहून देणाऱ्या व्यक्तीच्या नावे असावा. याबाबत कोणत्याही मा. न्यायालयात वाद प्रलंबित नसावा. या इमारतीची मालकी एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावे असल्यास त्या सर्वांनी एकत्रितपणे नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरारनामा संबंधित संस्थेच्या नावे करून दिलेला असावा. भाडेकरारावर घेतलेली जागा किंवा इमारतीचा करारनामा हा संस्थेच्या सदस्यांचा "परिवार" किंवा कुटुंबातील सदस्याच्या नावे केलेला नसावा आणि भाडेकराराची इमारतीची मालकी परिवारातील सदस्य किंवा कुटुंबापैकी नसावी.

१६. संस्थेची इमारत भाडे तत्वावर घेण्याबाबत केलेला करारनामा हा दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत (महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याप्रमाणे) केलेला असावा.

१७. मान्यता रद्द केलेली अथवा बंद पडलेली आश्रमशाळा चालविण्यासाठी इच्छूक असणाऱ्या संस्थेकडे नियोजित आश्रमशाळेसाठी स्वतःच्या मालकीची इमारत नसल्यास आणि इमारत भाडेकरारावर घ्यावयाची असल्यास ती सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केल्याप्रमाणे असणे बंधनकारक राहील. याबाबतचा प्रत्यक्ष स्थळ तपासणी नकाशा बांधकाम क्षेत्रासहीत / बांधकामाचे वर्ष बांधकामाची वर्गवारी व फोटोग्राफसह (सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेला) प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१८. नियोजित आश्रमशाळेसाठी नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरारावर घेतलेली इमारत संस्थेस जास्तीत जास्त ०२ वर्षापर्यंत भाडेकरारावर घेता येईल. ०२ वर्षात संस्थेने आश्रमशाळा

संहितेमधील मानकामध्ये नमूद सर्व भौतिक सोयी-सुविधांनी युक्त स्वतःच्या मालकीची सुसज्ज पक्की इमारत बांधकाम करून घेणे बंधनकारक राहील. तसेच सदर इमारत पक्की/चांगली विकसित असल्याबाबतचे प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून घ्यावे. भाडेकरारावर घेतलेल्या इमारतीमध्ये शाळा, वसतिगृह, भोजनगृह, स्वयपांकगृह, स्नानगृह, शौचालय, संरक्षक भिंत, मुला- मुलींच्या खेळण्यासाठी मैदान व इतर आवश्यक भौतिक सोयी-सुविधा स्वतः उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

१९. आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात बंद पडलेली किंवा मान्यता रद्द केलेली अनुदानित आश्रमशाळा हस्तांतरीत/स्थलांतरीत करण्यासाठी ज्या इच्छूक संस्थांनी प्रस्ताव सादर केला असेल त्या प्रस्तावासोबत या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या बाबी आश्रमशाळा हस्तांतर / स्थलांतराचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षाच्या कालावधीत उपलब्ध करून दिल्या नाही तर त्यांच्या संस्थेस पाच वर्षाच्या कालावधीनंतर इमारत भाडे व वेतनेतर अनुदान तसेच इतर सर्व अनुदान मंजूर केले जाणार नाही, याची मला जाणीव असल्याबाबतचे हमीपत्र रू. १००/- एवढ्या रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करून देणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर बंधपत्र प्रस्तावासोबत सादर न केल्यास त्या संस्थेस अपात्र ठरविण्यात येईल. बंद पडलेली/मान्यता रद्द केलेली अनुदानित आश्रमशाळा सदर संस्थेस चालविण्यास दिल्यापासून २ वर्षात जर स्वतःची सर्व सोयी- सुविधायुक्त पक्की इमारत बांधली नाही, तर सर्व अनुदान बंद करुन त्या आश्रमशाळेची मान्यता रद्द करून ती अन्य संस्थेस हस्तांतरीत करण्याची प्रक्रीया सुरू केली जाईल.

२०. इच्छूक संस्थेस धर्मादाय आयुक्त, मा. न्यायालय किंवा शासनाने दंड केलेला नसावा. तसेच संस्थेमध्ये, संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही उपक्रमामध्ये, पदाधिकाऱ्यांमध्ये किंवा कर्मचाऱ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद उत्पन्न झालेला नसावा. त्याचप्रमाणे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी किंवा आर्थिक फसवणूकीचे गुन्हे कोणत्याही न्यायालयात चार्जशिट दाखल केलेले प्रकरण न्यायप्रविष्ठ नसावे. त्याबाबतची सविस्तर माहिती रू. १००/- एवढ्या रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करून प्रस्तावासोबत सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२१. संस्थेने यापूर्वी शासनानिरूद्ध मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे किंवा कसे? असल्यास ती प्रलंबित आहे का किंवा निकाल लागला असल्यास त्याची माहिती प्रस्तावासोबत सादर करावी.

२२. इच्छूक संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावातील सर्व माहिती खरी असल्याचे हमीपत्र रु.१००/- एवढ्या रक्कमेच्या बंधपत्रावर नोटरी करुन प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२३. विद्यार्थी संख्येअभावी ज्या आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात आली असेल अथवा आश्रमशाळा बंद पडली असेल तर अशी आश्रमशाळा अन्य संस्थेकडे हस्तांतरित करुन

नजीकच्या ठिकाणी, लगतच्या तालुक्यात किंवा लगतच्या जिल्ह्यात स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. मात्र मूळ ठिकाणापासून स्थलांतरीत ठिकाण यामधील अंतर ५० कि.मी. पेक्षा अधिक असणार नाही तसेच त्या प्रस्तावित ठिकाणाच्या ३ कि.मी परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र/दवाखाना व सदर ठिकाण पोलीस ठाणे/पोलीस मदत केंद्र/पोलीस चौकी असणे आवश्यक आहे. त्यामुळे इच्छूक संस्थांनी सदर बाब विचारात घेवून प्रस्ताव सादर करावेत.

२४. मान्यता रद्द केलेल्या अथवा बंद पडलेल्या आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन नवीन हस्तांतरीत / स्थलांतरीत झालेल्या आश्रमशाळेत करण्यात येईल. त्यामुळे सदरहू कर्मचाऱ्यांना तात्काळ रुजू करून घेण्याची कार्यवाही संस्थेने करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन न झाल्यास आश्रमशाळा हस्तांतर / स्थलांतराचे आदेश रद्द करण्यात येतील.

२५. अपवादात्मक परीस्थितीत प्रकरणपरत्वे निकड व आवश्यकता विचारात घेऊन गुणवत्तेनुसर अटी व शर्ती शिथील करण्याचे अंतिम अधिकार शासनास राहतील.

**अ-१. अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयाने करावयाची कार्यवाहीः-**

१) इच्छूक संस्थेबाबतची सविस्तर माहिती शासनास सादर करावी. तसेच संस्थेच्या गैरकारभाराबाबत माहिती उपलब्ध असल्यास शासनास अवगत करावे.

२) इच्छूक संस्थेतर्फे यापूर्वी शासकीय अथवा सार्वजनिक निधीचा अपहार केल्याच्या तक्रारी असल्यास त्याची माहिती सादर करावी.

३) मान्यता रद्द केलेल्या अथवा बंद पडलेल्या आश्रमशाळेच्या संस्थेतर्फे किंवा कर्मचाऱ्यांतर्फे शासनाविरुध्द मा. न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे काय, असल्यास ती याचिका प्रलंबित आहे काय किंवा त्यासंदर्भात मा. न्यायालयाने काही निर्णय दिला आहे काय, असल्यास मा. न्यायालयाचे आदेश काय आहेत त्याबाबतची माहिती सादर करावी.

४) मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळेची मान्यता कोणत्या कारणास्तव रद्द करण्यात आली अथवा बंद पडलेली आश्रमशाळा कोणत्या कारणामुळे बंद पडली याबाबतची सविस्तर माहिती सादर करावी.

५) ज्या शैक्षणिक वर्षात आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे त्या शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत सदर आश्रमशाळा प्रशासकामार्फत चालू ठेवण्यात यावी. शैक्षणिक वर्षाच्या समाप्तीनंतर नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वीच तेथील विद्यार्थ्यांचे नजीकच्या आश्रमशाळेत प्रथमतः समायोजन करण्यात यावे. तद्नंतर सदर आश्रमशाळा इतर सक्षम स्वयंसेवी संस्थेस विहित कार्यपध्दतीनुसार हस्तांतर/स्थलांतर करण्याबाबत शासनाकडे प्रस्तावित करावे.

६) बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळेतील विद्यार्थीसंख्या ही शासनाचे निकषाप्रमाणे होती, परंतु संस्थेच्या उदासिनतेमुळे सदर आश्रमशाळेची मान्यता रद्द करावी लागल्यास किंवा ती आश्रमशाळा बंद पडल्यास अशी आश्रमशाळा अन्य संस्थेकडे फक्त हस्तांतरीत करण्यासंदर्भात इच्छूक संस्थांकडुन प्रस्ताव मागविण्यासंदर्भात जाहिरात प्रसिद्ध करण्यास अनुमती देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

७) मान्यता रद्द केलेली अथवा बंद पडलेली आश्रमशाळा ज्या संस्थेकडे हस्तांतर / स्थलांतरीत करण्यात आली असेल त्या आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन नवीन हस्तांतरीत / स्थलांतरीत झालेल्या आश्रमशाळेत करण्यात यावे.

८) अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखाद्या आश्रमशाळेचे हस्तांतर / स्थलांतर करणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीने शासनास सादर करावा.

९) प्राथमिक आश्रमशाळा स्थलांतराचा प्रस्ताव सादर करताना नवीन ठिकाणी आश्रमशाळा स्थलांतर केल्याने "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९" व नियम- २०११ अनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याबाबतचे पुरावे म्हणून जुन्या सुविधा व नवीन सुविधा यांची तुलनात्मक माहिती / छायाचित्रे प्रस्तावासोबत पाठवावीत.

१०) आश्रमशाळा स्थलांतराच्या प्रस्तावाची शिफारस करताना संबंधित संस्थेने सर्व सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून दिल्याची खात्री करुन तशी स्पष्ट शिफारस करण्याची कार्यवाही राज्यस्तरीय समितीने करावी.

**ब. सध्या सुरू असलेली आश्रमशाळांचे स्थलांतर करण्याबाबतची आवश्यक कारणे :-**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात सर्व दूरवर प्रथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदरहू अनुदानित आश्रमशाळा निरनिराळ्या कारणास्तव एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यासाठी संबंधित संस्था शासनाकडे विनंती अर्ज करीत असतात. त्या आश्रमशाळांचे स्थलांतर योग्य रितीने व्हावे व विद्यमान विद्यार्थ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ नये यासाठी शासनाने योग्य ते आदेश वेळोवेळी निर्गमित केले आहेत. असे असून सुध्दा बरेचसे संस्थाचालक मूळ उद्देश सादर न करता

केवळ स्वहितासाठी किंवा इतर कारणांसाठी स्थलांतराची मागणी करीत असतात. आश्रमशाळा स्थलांतराची विनंती विद्यार्थ्यांची गरज भागविण्यासाठी व विद्यार्थ्यांचे हित जोपासण्यासाठी होणे आवश्यक आहे. तसेच ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षण मिळावे यासाठी भारतीय घटनेमध्ये २००२ साली दुरुस्ती करण्यात आली असून हा त्यांचा एक मूलभूत अधिकार झाला आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने "बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अधिनियम, २००९" पारित केला असून त्यांची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात स्वयंसेवी संस्थाव्दारा संचलित अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना खाली नमूद केलेल्या अपवादात्मक परिस्थिती व्यतिरिक्त कोणत्याही कारणास्तव स्थलांतराची परवानगी देता येणार नाही.

१. आश्रमशाळेची इमारत जीर्ण व धोकादायक किंवा नैसर्गिक आपत्तीमध्ये क्षतिग्रसत झालेली असल्यास किंवा प्रकल्पामुळे बाधित होत असल्याने अशा आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणे अशक्य असल्यास.
२. सध्याच्या अपुऱ्या इमारतीमधून संस्थेने स्वतःच्या मालकीच्या / नोंदणीकृत भाडेकराराने घेतलेल्या स्वयंपूर्ण इमारतीमध्ये स्थलांतरीत होण्यासाठी प्रस्ताव सादर केल्यास .
३. सध्याच्या भाडयाच्या इमारतीमधून स्वतःच्या इमारतीमध्ये स्थलांतराचा प्रस्ताव सादर केल्यास.
४. आश्रमशाळा सध्या ज्या ठिकाणी कार्यान्वित आहे अशा ठिकाणी सिंचन प्रकल्प अथवा इतर सार्वजनिक उपक्रम सुरु होणार असतील व त्यासाठी सदरच्या जागेचे अधिग्रहण करणे आवश्यक असेल किंवा पूर, भूकंप इ. सारख्या नैगर्गिक आपत्तीचा धोका असल्यास.
५. सध्या आश्रमशाळा ज्या ठिकाणी आहे त्या सभोवतालची गावे दुसरीकडे स्थलांतरीत झाली असल्यास किंवा इतर कारणांमुळे आश्रमशाळेच्या परिसरात असलेली लोकसंख्या कमी झाल्यामुळे आश्रमशाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची मान्य संख्या ५० टक्के पेक्षा कमी झाली असल्यास.
६. ज्या ठिकाणी आश्रमशाळा असेल त्या ठिकाणी मूलभूत सोयीसुविधा इत्यादीबाबत गंभीर समस्या निर्माण झाली असल्यास किंवा जातीय तणाव, गटबाजीचा संघर्ष मोठ्या प्रमाणात असल्यास किंवा सार्वजनिक अशांततेच्या घटना वारंवार घडत असल्यास याबाबत पोलिसांचा अहवाल आवश्यक राहील.

७. संबंधीत आश्रमशाळेची विद्यमान जागा असुरक्षित असल्यास, सध्या असलेल्या आश्रमशाळेच्या ठिकाणापासून १० कि.मी. परिसरातील गावे प्रकल्पबाधीत झाली असल्यास अथवा सदर आश्रमशाळेचे ठिकाण/गाव प्रकल्पबाधीत झाले असल्यास.

८. संस्थेस आश्रमशाळा चालू असलेल्या ठिकाणी वीज, पाणी, इमारत, मैदान किंवा अन्य स्थानिक अपुऱ्या सोयीमुळे किंवा स्थानिक प्रासंगिक कारणामुळे एखाद्या शाळेचे स्थलांतर करणे आवश्यक असल्यास.

९. इतर अन्य कारणामुळे, जर शासनास ते कारण योग्य वाटत असेल आणि ते विद्यार्थ्यांचे हिताचे असेल.

**ब-१. सध्या सुरू असलेली आश्रमशाळा हस्तांतर / स्थलांतर करताना अनुसरावयाची कार्यपद्धती :-**

बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळांचे हस्तांतर करून स्थलांतर करताना किंवा एखाद्या संस्थेच्या विनंतीनुसार स्थलांतराची परवानगी देताना अथवा परवानगी दिल्यानंतर खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक राहील:-

१. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतराची परवानगी देण्यासाठी सविस्तर कारणांसह परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक राहील.

२. आदिवासी विकास विभागांतर्गत बंद पडलेल्या/मान्यता रद्द केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा स्थलांतरीत करताना ज्या ठिकाणी ही आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाची आहे ती जागा पूर्वीच्या आश्रमशाळेच्या ५० कि.मी. अंतरापेक्षा जास्त अंतरावर असू नये. तसेच त्या प्रस्तावित ठिकाणाच्या ३ कि.मी परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र/दवाखाना व सदर ठिकाण पोलीस ठाणे/पोलीस मदत केंद्र/पोलीस चौकी असणे आवश्यक आहे.

३. राज्यात अन्यत्र बंद पडलेली/मान्यता रद्द करण्यात आलेली अनुदानित आश्रमशाळा ज्या ठिकाणी हस्तांतरीत/स्थलांतरीत करावयाची आहे त्या ठिकाणी आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी/आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्राकरीता आदिवासी लोकसंख्या अंदाजे ३००० ते ५००० इतकी असावी. तर दुर्गम भागातील क्षेत्रासाठी आदिवासी लोकसंख्या अंदाजे २००० ते ३००० इतकी असावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी किमान ७ कि.मी. आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात किमान १० कि.मी च्या परिसरात आदिवासी विकास विभागाची शासकीय अथवा अनुदानित आश्रमशाळा नसावी. त्या ठिकाणी पाणी पुरवठा, वीज, रस्ते इ. ची सोय असावी. तसेच परिसरातील १० कि.मी. भौगोलीक क्षेत्रातुन अनुदानित आदिवासी आश्रमशाळेकरीता पुरेशा प्रमाणात आदिवासी विद्यार्थी उपलब्ध असावेत.

४. ज्या नवीन ठिकाणी अनुदानित आश्रमशाळा स्थलांतरीत करावयाची आहे तेथे इमारत (स्वतः ची किंवा भाडयाची) व इतर सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक राहील. इमारत नोंदणीकृत भाडेकरारावर असल्यास फक्त २ वर्षापर्यंत परवानगी देण्यात येईल आणि २ वर्षांत स्वतःच्या मालकीची इमारत बांधणे बंधनकारक राहील. अन्यथा सर्व अनुदान बंद करून सदरील आश्रमशाळा इतर संस्थेस हस्तांतर केली जाईल.

५. प्राथमिक आश्रमशाळेचे स्थलांतर करावयाचे असल्यास शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ व नियम-२०११ च्या तरतुदीमधील निकष पूर्ण करणे आवश्यक राहील.

६. आश्रमशाळेस मान्य पटसंख्या व सरासरी हजेरी यामध्ये कोणतीही सूट दिली जाणार नाही.

७. आश्रमशाळेस स्थलांतराची परवानगी दिल्यानंतर त्याबाबतच्या अटी व शर्ती संस्था पूर्ण करीत नसल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास किंवा चुकीची माहिती सादर केल्याचे निष्पन्न झाल्यास आश्रमशाळा स्थलांतराचे आदेश रद्द करण्यात येतील.

८. आश्रमशाळा स्थलांतरापूर्वीचे ठिकाणी विद्यार्थ्यांची शिक्षणाची व राहण्याची गैरसोय झाली आहे, याची सक्षम प्राधिकाऱ्याने खात्री करणे आवश्यक आहे. तसेच ज्या ठिकाणी हस्तांतरण होत आहे तिथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करणे आवश्यक राहील. याबाबतचा तुलनात्मक अहवाल शासनास सादर करावा.

९. एखाद्या आश्रमशाळेस स्थलांतराची परवानगी द्यावयाची झाल्यास सध्या त्या आश्रमशाळेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना स्थलांतरीत ठिकाणी समायोजित करणे आवश्यक आहे किंवा त्या विद्यार्थ्यांची नजीकच्या आश्रमशाळेत समायोजन झाल्याशिवाय त्या आश्रमशाळेस स्थलांतराची परवानगी दिली जाणार नाही. पूर्वीच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे अन्य शाळेत समायोजन केल्याबाबच्या पुराव्यासह हमीपत्र संबंधित आश्रमशाळेच्या संस्थेकडून रू. १००/- एवढ्या रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करून घेणे आवश्यक राहील.

१०. आश्रमशाळा स्थलांतरीत करण्यापूर्वी त्यामधील विद्यार्थीसंख्या प्रथमतः विचारात घेण्यात यावी. जर विद्यार्थी संख्या ही मान्य विद्यार्थीसंख्येच्या ५० टक्केपेक्षा कमी झाल्यास त्या आश्रमशाळेचे अन्यत्र स्थलांतर करण्याबाबत विचार करण्यात यावा किंवा संस्थेच्या उदासिनतेमुळे अथवा दुर्लक्षामुळे विद्यार्थीसंख्येत घट होत असल्यास सदरहू संस्थेची ही आश्रमशाळा अन्य इच्छूक संस्थेकडे हस्तांतरीत करण्याबाबत प्रक्रीया सुरू करावी.

११. एखादी आश्रमशाळा ज्या ठिकाणी स्थलांतरीत करावयाची आहे, त्या कार्यक्षेत्रातील संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास यांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२. एखादी आश्रमशाळा एखाद्या संस्थेस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करावयाची झाल्यास स्थलांतरीत ठिकाणी स्थलांतराबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र / संमती प्राप्त झाल्यानंतर आणि शासनाने स्थलांतराची परवानगी दिल्यानंतर स्थलांतरीत ठिकाणी संबंधित आश्रमशाळेसाठी आवश्यक असलेल्या आश्रमशाळा संहिता-२०१९ मधील मानकामध्ये नमूद शाळा व वसतीगृह इमारती, संरक्षक भिंत, शौचालय, स्नानगृहे आणि इतर आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देणे संस्थेस बंधनकारक असेल. सदरील बाबी उपलब्ध करून न दिल्यास अशा संस्थेच्या आश्रमशाळेस कोणतेही अनुदान अदा केले जाणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

१३. एखादी अनुदानित आश्रमशाळा ज्या ठिकाणी स्थलांतरीत होत आहे, तिथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी अन्य अनुदानित आश्रमशाळा नसावी. तथापि विद्यार्थ्यांचे हित विचारात घेऊन प्राथमिक आश्रमशाळेच्या ठिकाणी माध्यमिक, माध्यमिक आश्रमशाळेच्या ठिकाणी प्राथमिक किंवा उच्च माध्यमिक आश्रमशाळा स्थलांतरीत करण्यास परवानगी देता येईल. त्याचप्रमाणे उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या ठिकाणी माध्यमिक आश्रमशाळा स्थलांतरीत करण्यास परवानगी देता येईल.

१४. एखाद्या आश्रमशाळेचे स्थलांतर करणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव राज्यस्तरीय समितीमार्फत तपासणी करून शासनास सादर करण्यात यावा.

**ब-२. इतर बाबी:-**

१. शासनाच्या मान्यतेशिवाय आश्रमशाळेचे परस्पर हस्तांतरण अवैध आहे. त्यामुळे उद्भवणारे विविध प्रश्न उदा. कर्मचारी, स्थावर जंगम मालमत्ता व विद्यार्थी संख्या याबाबत राज्य शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. अशा परस्पर हस्तांतरीत केलेल्या आश्रमशाळेची मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल. अशी रद्द झालेली आश्रमशाळा अन्य संस्थेकडे हस्तांतरण करण्याचे अधिकार शासनास राहतील. हस्तांतर प्रस्तावासोबत दोन्ही संस्थांच्या ठरावाची प्रत / दोन्ही संस्थांमध्ये स्थावर, जंगम मालमत्ता/चल व अचल संपत्ती व इतर बाबींबाबत झालेला वैधानिक कराराची प्रत आणि दुसरी संस्थेचा ठराव तसेच संमतीपत्र जोडणे आवश्यक राहील. तसेच अशा प्रकारच्या हस्तांतरणाला धर्मादाय आयुक्त किंवा इतर सक्षम प्राधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा सहमती बाबत पुरावा जोडावा. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची संमती जोडावी.

२. राज्यस्तरावरील समिती शासनास प्रस्तावांची शिफारस करेल. तद्नंतर शासन सक्षम व पात्र असणाऱ्या संस्थेस बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या किंवा मान्यता काढून घेतलेल्या आश्रमशाळा हस्तांतर करण्याबाबत यथायोग्य निर्णय शासन स्तरावर घेतला जाईल व शासनाचा तो निर्णय अंतिम राहील. शासनाने मान्यता रद्द केलेल्या अथवा काढून घेतलेल्या किंवा काही

कारणास्तव बंद झालेल्या आश्रमशाळा विचारात घेवुन दरवर्षी नविन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी आश्रमशाळा हस्तांतर / स्थलांतराचे आदेश शासन स्तरावरून पारित केले जातील.

३. विद्यार्थी संख्येअभावी बंद पडलेली आश्रमशाळा पुन्हा त्याच ठिकाणी सुरू करण्यास परवानगी दिली जाणार नाही. तेथील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रकरणपरत्वे लगतच्या आश्रमशाळेत समायोजन करण्याची व्यवस्था केली जाईल. सदरहू आश्रमशाळेतील कर्मचारीवर्गास समायोजनाच्या यादीवर ठेवण्यात येईल.

४. बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळेत जेवढे शैक्षणिक वर्ग सुरु करण्यात आले होते, ते सर्व वर्ग आश्रमशाळा हस्तांतरीत / स्थलांतरीत झालेल्या ठिकाणी एकाच वेळी सुरु करणे आवश्यक राहील. तसेच या बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळांमधील मान्यता प्राप्त सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याची जबाबदारी नविन संस्थेची राहील. शाळा हस्तांतरणाच्या / स्थलांतरणाच्या अनुषंगाने कोणत्याही नवीन पदास मान्यता दिली जाणार नाही. शाळातील पटसंख्या कमी झाल्याने मान्यता रद्द केल्यास अशा शाळातील कर्मचाऱ्यांना जेष्ठतेनुसार अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या यादीत समाविष्ट केले जाईल व जेष्ठतेनुसार त्यांचे अन्य आश्रमशाळेत समायोजन केले जाईल.

५. इच्छूक संस्थेस हस्तांतर / स्थलांतराची परवानगी दिल्यानंतर परवानगी दिलेल्या ठिकाणी ती आश्रमशाळा शासनाच्या अटी-शर्तीप्रमाणे/आश्रमशाळा संहितेमधील याबाबत नमूद मानकानूसार सुरु करणे बंधनकारक राहील. तथापि, शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी अथवा झाल्यांनतरच्या महिन्यात आश्रमशाळा हस्तंतराची / स्थलांतराची परवानगी दिली असल्यास परवानगी दिल्याच्या तारखेपासून ३० दिवसांत परवानगी दिलेल्या ठिकाणी ती आश्रमशाळा सुरू करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत आश्रमशाळा सुरु न केल्यास सदर आश्रमशाळेचे हस्तांतर / स्थलांतर आपोआप रद्द समजण्यात येईल.

६. बंद पडलेल्या / मान्यता रद्द करण्यात आलेल्या आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इच्छूक संस्थेकडे हस्तांतर / स्थलांतर केलेल्या आश्रमशाळेत समायोजन केल्यानंतर ३० दिवसांत रूजु होणे बंधनकारक राहील. समायोजनात जर शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध असल्यास कोणत्याही सबबीवर इच्छूक संस्थेस नवीन कर्मचारी भरतीची परवानगी दिली जाणार नाही. समायोजनाकरीता असे कर्मचारी उपलब्ध नसल्यास याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल. सदरहू आश्रमशाळेत पूर्वीच्या आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन केल्यानंतरही काही जागा रिक्त राहात असल्यास त्या जागेवर अन्य आश्रमशाळेतून अतिरीक्त ठरविण्यात आलेल्या आश्रमशाळेतील सर्व मान्यताप्राप्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती हस्तांतरित / स्थलांतरीत झालेल्या आश्रमशाळेमध्ये करण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांना समायोजनाचे आदेश दिल्याच्या तारखेपासून ३० दिवसात संबंधित आश्रमशाळेत रुजू होणे बंधनकारक राहील. बंद पडलेल्या / मान्यता रद्द करण्यात

आलेल्या आश्रमशाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन होईपर्यंत अशा अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत या विभागाच्या दिनांक ०८.०६.२०१६, दिनांक २९.०४.२०१७ व दिनांक ११.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

७. जे शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी हस्तांतरीत झालेल्या आश्रमशाळेच्या ठिकाणी उचित कारणाशिवाय ३० दिवसाच्या आत रुजू होणार नाहीत, त्यांना सेवेची आवश्यकता नाही, असे समजून त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागेवर प्रथमतः जिल्ह्यातील, विभागातील किंवा राज्यातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या यादीमधून सेवाजेष्ठ अतिरीक्त कर्मचाऱ्याची समायोजनाने नियुक्ती करण्यात येईल.

८. हस्तांतरीत/स्थालांतरीत झालेल्या आश्रमशाळा उत्तमरित्या संस्थेच्या स्वनिधीतून चालविणे ही जबाबदारी प्रामुख्याने संबंधीत संस्थेची राहील. देय बाबींवरील अनुज्ञेय खर्चाची प्रतिपूर्ती वेळोवेळी शासनाचे ध्येयधोरण व अनुदानाचे उपलब्धतेनुसार केली जाईल. तसेच शासनाचे अनुदान उपलब्ध होईपर्यंत आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन आणि विद्यार्थ्यांना परिपोषण अनुदान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असेल, अशा आशयाचे हमीपत्र रू.१००/-एवढ्या रकमेच्या बंधपत्रावर नोटरी करून देणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. त्याशिवाय संबंधित इच्छूक संस्थेस मान्यता रद्द केलेली अथवा बंद पडलेली आश्रमशाळा हस्तांतरीत / स्थलांतरीत करण्याची कार्यवाही केली जाणार नाही.

**क.** राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत ज्या अनुदानित आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात आली असेल अथवा ज्या आश्रमशाळा काही कारणास्तव बंद पडल्या असतील अशा आश्रमशाळा अन्य इच्छूक संस्थेकडे हस्तांतरीत/ स्थलांतरीत करण्याकरीता त्या इच्छूक संस्थेच्या प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची छाननी करण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे. तसेच ज्या चालू असलेल्या आश्रमशाळा इतर संस्था किंवा इतर ठिकाणी हस्तांतरीत/ स्थलांतरीत करण्याबाबतच्या प्राप्त प्रस्तावांची तपासणीसाठीसुद्धा सदर समिती करेल. सदरील प्रस्ताव मूल्यांकनाचे धोरण सदरील समिती ठरवेल तसेच याबाबत गुणांकनाच्या कुठल्या बाबी राहतील याबाबत प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमध्ये त्याचा स्पष्ट उल्लेख करेल.

**राज्यस्तरीय प्रस्ताव छाननी व मुल्यांकन समिती**

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | अध्यक्ष |
| २ | अपर आयुक्त/सह आयुक्त, आदिवासी आयुक्तालय, नाशिक | सदस्य |
| ३ | संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास | सदस्य |
| ४ | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ५ | सहायक आयुक्त (शिक्षण) आदिवासी आयुक्तालय, नाशिक | सदस्य सचिव |

वरील समितीने प्राप्त झालेल्या आश्रमशाळांबाबतच्या सर्व प्रस्तावांची छाननी करुन १५ दिवसांत आपला अहवाल मुल्यांकनासह शासनास सादर करावा. अशाप्रकारे शासन गुणवत्तेच्या आधारे या संस्थांची शाळा हस्तांतरण/चालविण्यासाठी निवड करील. यासंदर्भात शासनाचा निर्णय अंतिम राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४१०१५१७०३१२९९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN GORAKSHANATH SATHE

Digitally signed by PRAVIN GORAKSHANATH SATHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=8aeae114bc10bc084ffcdf2ae0c667ca6c3eca844c7809bb00f184ed1dc997ce, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7D0E975C83DBBE2A19FD387F2130D87449EAD27B920A608BF243707CB95AAAA3, cn=PRAVIN GORAKSHANATH SATHE
Date: 2024.10.15 18:49:31 +05'30'

**(प्रविण गो. साठे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई

४. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

५. अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे/नाशिक/अमरावती/ नागपूर.

६. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

७. निवडनस्ती का.११.